मंगळवार दि.११ जून २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २८३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक लोकनेता
बीड

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# 'विधानसभा निवडणुकीसाठी जोमात कामाला लागा' : उद्धव ठाकरेंच्या सूचना

## आमदार, नवनिर्वाचित खासदारांची सेना भवनात बैठक

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज आपल्या सर्व आमदार आणि नवनिर्वाचित खासदारांची सेना भवनात बैठक घेतली. लोकसभा निवडणुकीचे निकाल आणि आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारी या बैठकीमध्ये चर्चा झाली. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. शिवसेना भवनात सुरू असलेली ही बैठक संपली आहे. ठाकरे गटाकडून विधानसभेची तयारी सुरू करण्यात आली आहे. 'विधानसभा निवडणुकीसाठी जोमात कामाला लागा' अशा सूचना उद्धव ठाकरे यांनी आमदार–खासदारांना दिल्या आहेत.**

लोकनेता न्यूज नेटवर्क
मुंबई (वृत्तसंस्था)

लोसकभा निवडणुकीत चांगले यश मिळाल्यानंतर उद्धव ठाकरे गटाच्या वतीने आता विधानसभा निवणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी बैठकांचे सत्र सुरू करण्यात आले आहे. मुंबईत नव्याने निवडून आलेल्या सर्व खासदारांसह आमदार आणि प्रमुख नेत्यांची बैठक उद्धव ठाकरे यांनी घेतली. या बैठकीमध्ये ठाकरे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना विधानसभा निवडणुकीसाठी जोमात कामाला लागा अशा सूचना दिल्या आहेत.कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे नवनिर्वाचित खासदार शाहू महाराज छत्रपती यांनी आज मातोश्री येथे उद्धव ठाकरे यांची भेट घेतलीनरेंद्र मोदी आणि भाजपचे बहुमत खाली आणण्यामध्ये महाराष्ट्राचे योगदान मोठे असल्याचा दावा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. २८८ मतदार संघामध्ये संघटनात्मक बांधणी होणे गरजेचे आहे. या शिवाय विधान परिषदेच्या निवडणुकीबाबत देखील आजच्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली असल्याची माहिती संजय राऊत यांनी दिली. विधानसभा निवडणुकीला महाविकास आघाडी एकत्र सामोरे जाईल, असा दावा देखील राऊत यांनी केला आहे. मात्र, पक्ष संघटना म्हणून संघटनात्मक बांधणीच्या दृष्टीने संपूर्ण राज्यात इनडोअर बैठका होणार असल्याची माहिती संजय राऊत यांनी म्हटले आहे. महाविकास आघाडी २८८ मतदार संघामध्ये एकत्रित निवडणूक लढवणार असून १८० जागा जिंकेल असा दावा देखील राऊत यांनी केला आहे.



# डॉ.प्रवीण शांताराम डुंबरे यांना साहित्यभूषण पुरस्कार प्रदान



लोकनेता न्यूज नेटवर्क
ओतूर । मयूर ढोबळे

दि. ८ जून रोजी मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे येथे २० व्या राज्यस्तरीय काव्य संमेलन आणि राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये, मराठी साहित्य मंडळ, ठाणे यांचा साहित्यभूषण पुरस्कार मराठी साहित्य मंडळ ठाणेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जयप्रकाश घुमटकर व ठाणे शहरचे आमदार श्री. संजय केळकर यांचे शुभहस्ते जुन्नर तालुक्यातील ओतुर गावचे कविवर्य डॉ. प्रविण शांताराम डुंबरे यांना मोरपंखी काव्यसंग्रह व उत्तम साहित्यिक कामगिरीबद्दल प्रधान करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष ज्येष्ठ कवयित्री ललिता गवांदे, गजल सम्राज्ञी निलाताई वाघमारे, सिद्धार्थ कुलकर्णी, डॉ. घनश्याम पांचाळ, डॉ. नीता बोडके, राजेश थळकर, अवधूत शिरोडकर, प्रफुल गवांदे, ठाणे येथील ज्येष्ठ साहित्यिक संजय गवांदे, वर्ल्ड व्हिजन टाइम्स मुंबईचे संपादक प्रा. नागेश हुलवळे, डॉ. संजय वेताळ, डॉ. सुनीता वेताळ, प्रतिभा डुंबरे उपस्थित होते.

# श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्यास जुन्नर तालुक्यातील शेतकरी संघटनांचा आंदोलनाचा इशारा

लोकनेता न्यूज नेटवर्क
जुन्नर । मयूर ढोबळे

जुन्नर तालुक्यातील विविध शेतकरी संघटना प्रतिनिधींनी सन २०२३/२०२४ ला गाळपास आलेल्या ऊसाला अंतिम दर ५००० रुपये दयावा या मागणीचे निवेदन पत्र श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर यांना देण्यात आले.सन २०२३/ गाळपास आलेल्या ऊसाला माळेगाव कारखान्याचा साखर उतारा ११.४७% ऊस दर ३२०० रुपये.भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचा साखर उतारा ११.४६% ऊस दर २९००रुपये.श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचा साखर उतारा ११.६३% परंतु ऊस दर २७०० रुपये उर्वरित ३०० रुपये फरक बिल तात्काळ काढावे.शेतकऱ्यांकडून सतत विचारणा होत आहे की विघ्नहर करखाना ऊसाची ऋझ देत नाही. वरील कारणांमुळे शेतकरी संघटना जाहीर करत आहे की.कारखान्याच्या गेटवर



एक दिवसीय धरणे आंदोलन करणार आहे.जर कारखाना संचालक मंडळाने लक्ष दिले नाही तर नंतर आमरण उपोषणाचा निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना अध्यक्ष , संचालक मंडळ यांना सर्व शेतकरी संघटनेच्या वतीने विनंती करण्यात आली . कारखान्याने गाळपास आलेल्या उसाची एफआरपी जाहीर करावी व इतर कारखान्याच्या बरोबरीने फरक ३०० रुपयेचे ऊस बिल तात्काळ उस उत्पादकांच्या खात्यावर वर्ग करावे अन्यथा शेतकरी संघटनांच्या तीव्र आंदोलनाला कारखान्याला सामोरे जावे लागेल. श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा.सत्यशीलदादा शेरकर यांच्याबरोबर एक दीड तास उस दरासंदर्भात साधक-बाधक चर्चा झाली.खरिप पेरणीसाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना फरकाचे बिल देण्यात येईल असे देखील आश्वासन चेअरमन यांनी दिले आहे.व अंतिम दर जास्तीत जास्त देण्याचा देखील दरवर्षीप्रमाणे प्रयत्न श्री.विघ्नहर सहकारी साखर कारखाना करणार आहे असे देखील त्यांनी सांगितले.त्यामुळे पुढील काही दिवसांमध्ये जर श्री.विघ्नहर कारखान्याने फरकाचे बिल काढले नाही तर सर्व संघटना रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही असे देखील शेतकरी संघटना प्रतिनिधींनी निवेदन देताना चेअरमन सत्यशीलदादा यांना सांगितले आहे.यावेळी जुन्नर तालुक्यातील विविध शेतकरी संघटना प्रतिनिधी डॉ.गणपत डुंबरे कार्याध्यक्ष-शिवनेरी शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य.,श्री.राजेंद्र ढोमसे. राष्ट्रीयअध्यक्ष-शिवनेरी शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य.,श्री.रमेश शिंदे राष्ट्रीयअध्यक्ष-सह्याद्री शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य.,श्री.प्रमोद खांडगे पाटील जिल्हाध्यक्ष पुणे-अखिल भारतीय शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य.,श्री.योगेश तोडकर जिल्हाध्यक्ष पुणे-महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेना.,श्री.प्रवीण डोंगरे सचिव अखिल भारतीय शेतकरी संघटना जुन्नर., श्री.एकनाथ शिंदे., श्री.प्रकाश ढमाने.,श्री . ज्ञानेश्वर डोके ,श्री.राहुल वायकर उपस्थित होते .

# वडिलांनाच श्रीकांत शिंदे काबील वाटत नसतील

लोकनेता न्यूज नेटवर्क
मुंबई (वृत्तसंस्था)

प्रफुल्ल पटेल यांना पंतप्रधान मोदींकडून एक व्यतिगत गिफ्ट मिळालेले आहे. ईडीने त्यांची जप्त केलेली मालमत्ता सोडवली, त्यामुळं मंत्रिपद मिळाले नाही, तरी व्यक्तिगत गिफ्ट मिळाले अशी टीका राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. तसेच आता अजित पवार गटाला विधानसभा निवडणूक कमळ चिन्हावर लढवावी लागणार आहे असा दावाही त्यांनी केला आहे. शिवाय वडिलांना श्रीकांत शिंदे काबील वाटत नसतील तर आम्ही काय करणार असा टोलाही त्यांनी लगावला. प्रसार माध्यमांशी बोलतांना रोहित पवार म्हणाले, ''आम्ही सर्व जण आधीपासूनच सांगत होतो. लोकसभेपुरता अजित पवारांचा वापर भाजपकडून केला जाणार आहे. आता जे शरद पवारांना सोडून गेले आता त्यांना विधानसभा निवडणुकीत एकच पर्याय असेल ते म्हणजे राष्ट्रवादीऐवजी भाजपच्या चिन्हावर त्यांना लढावं लागेल.

## चारोळी

सुखदुःखाच्या झुल्यावरच
आयुष्य थोडे खुलते
हिरवळीत अन कोरडया रानीही
ते नव्याने फुलते.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# कडा येथील राष्ट्रीय महामार्गावरील पुलाच्या कामाची आ.सुरेश धस यांच्याकडून पाहणी

## पुलाचे काम तात्काळ करण्यासाठी अधिकाऱ्यांना दिल्या सूचना

लोकनेता न्यूज नेटवर्क
आष्टी । अण्णासाहेब साबळे

कडा येथील नगर बीड राष्ट्रीय महामार्गावरील पुलाचे काम अद्याप पूर्ण झाले नसुन या कामाची रविवारी आ.सुरेश धस यांनी पाहणी करुन लवकरात लवकर काम करण्यासाठीच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू झाले असून जुना पूल पूर्णपणे पाडून नष्ट केला आहे त्यामुळे मातीचा भराव टाकून दुसरी कडून वाहतूक वळवली आहे.मात्र जर कडा नदीला पाणी आले तर हा भराव वाहून गेल्यास राष्ट्रीय महामार्ग बंद पडू शकतो यासाठी आमदार सुरेश धस यांनी स्वतः रविवारी प्रत्यक्ष पुलाची पाहणी करून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता राजेंद्र भोपळे यांना लवकरात लवकर काम करून घेण्यासाठीच्या सूचना दिल्या. आष्टी कडा साबलखेड या रस्त्याचे काम मागच्या वर्षी एप्रिल महिन्यापासून सुरू झाले.हे काम खूप संथ गतीने सुरू असल्याने या रस्त्यावरून प्रवास करणे मोठ्या जिकरीचे झाले आहे . कोणताही रस्ता सलगपणे पूर्ण झालेला दिसत नाही.त्यातच कडा येथे कडी नदीवर असलेला पूल पाडून तिथे नवीन पुल बांधायचा आहे.रहदारीच्या दृष्टीने हा पूल महत्त्वाचा आहे.मात्र पुलाचे पाडकाम केल्यानंतर आतापर्यंत फक्त पूलाच्या भिंती अर्ध्या उंची एवढ्या बांधण्यात आलेल्या आहेत.आता पावसाळा सुरू झाला आहे.नदीला जर पाणी आलं तर हे काम पूर्ण कसे होईल हा ही प्रश्न आहेच.याशिवाय सध्या या मार्गावरील वाहतूक ज्या वळण रस्त्याने सुरू आहे तो रस्ता जर वाहून गेला तर नागरिकांनी येजा करायचे कसे हा ही मोठा प्रश्न आहे.त्यामुळे रविवारी आ.धस यांनी या कामावर भेट दिली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता राजेंद्र भोपळे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून नदीला पाणी आल्यास महामार्ग बंद होऊ शकतो यासाठी पुलाचे काम जलद गतीने करुन वाहतुकीसाठी पूल खुला करावा अशा सूचना दिल्या.यावेळी कडा गावचे सरपंच युवराज पाटील,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी,उपसरपंच बाळासाहेब कर्डिले,सामाजिक कार्यकर्ते अनिल तात्या ढोबळे,रमेश शिरोळे,यांच्यासह कडा गावातील नागरिक उपस्थित होते.



**कडा गावाच्या नागरिकांसाठी संपर्काच्या दृष्टीने आणि नगर बीड वाहतुकीसाठी कडी नदीवरील पूल महत्त्वाचा आहे.हा पुल लवकर बांधून पूर्ण झाला नाही तर सर्व वाहने धामणगाव किंवा शेरी खुर्द मार्गे जाण्याशिवाय पर्याय राहणार नाही .**

# कंधार तालुक्यात ६८ हजार ३०० हेक्टर क्षेत्रावर पेरणीसाठी बळीराजा सज्ज

## मन्याड खोऱ्यातील बळीराजा गुंतला पेरणीच्या कामात

लोकनेता न्यूज नेटवर्क
कंधार । धोंडीबा मुंडे

राज्यात लवकरच मान्सूनचे आगमन होणार असे भाकित हवामान विभागाने वर्तविलेले होते.ही आनंद वार्ता तालुक्यात पसरल्यानंतर शेतकऱ्यांनी उत्साहात खरीप हंगामाच्या पेरणीची तयारी सुरु केली आहे. त्याचवेळी मोसमी पावसाची प्रतिक्षाही केली जात आहे,यंदा पर्जन्यमानही चांगले होण्याची अपेक्षा आहे.त्यामुळे शेतकरी काहीसा सुखावला आहे.

दि.८ जून पासून खरीप हंगामातील पहिल्या मृग नक्षत्राला प्रारंभ झाला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार मराठवाड्यात यंदा मान्सून लवकरच सक्रिय होणार असल्याचे हवामान विभागाने वर्तविले आहे.

परंतु अजून पावसाने हजेरी लावलेली नाही.वातावरणात बदल होत आहे,मात्र पाऊस काही पडेनासा झाला आहे. खरीप हंगामासाठी ६८ हजार ३०० हेक्टर क्षेत्रावर जमीन पेरणीसाठी सज्ज झाली आहे.सर्व नागरिकांना मौसमी पावसाची आतुरतेने ओढ लागली आहे.कंधार तालुक्यात गत काही दिवसांपासून उन्हाचा कडाका



वाढल्याने ग्रामीणसह शहरातील नागरिक हैराण झाले आहेत.यंदा उष्णतेने नवनवीन रेकॉर्ड तयार केले आहेत. सातत्याने ४० च्या वर डिग्री सेल्सिअस तापमानाचे पारा चढल्याने नागरिक यावर्षी वैतागून गेले होते. कधी एकदा पावसाचे आगमन होणार आहे,याची उत्कंठा लागली आहे. जूनचा पहिला आठवडा संपला तरी अजून दमदार पाऊस सुरु झालेला नाही.पेरणीसाठी बळीराजाने सर्व पातळीवर तयारी केली आहे.बी-बियाणे, खते खरेदी केली आहेत.शेतात नांगरणी करून पेरणीसाठी शिवार सज्ज झाले आहेत.मृग नक्षत्राचे आगमन झाले आहे.नभात ढगाची गर्दी दाटून होत आहे.तालुक्यात खरीप हंगाम हाच महत्वपूर्ण हंगाम मानला जात असून तालुक्याचे अर्थ चक्र यावर अवलंबून आहे.कंधार तालुक्यात सोयाबीन, कापूस, हाळद तूर, मूग, उडीद, ज्वारी, बाजरी, सूर्यफूल,तीळ पिके घेतली जातात.खरीप हंगामासाठी पावसाची आतुरतेने प्रतीक्षा केली जात आहे. पाऊस वेळेवर आला तर कापूस व हाळद लागवड आणि त्यावर उंगवण योग्य होणार यासाठी पाऊस आवश्यक आहे. तालुक्यात वारकरी संप्रदाय मोठ्या प्रमाणावर असून वारकऱ्यांना माऊलीच्या वारीचे वेध लागले आहेत. वेळेत पेरणी योग्य पाऊस झाल्यास पेरणी वाढून आनंदाने वारीत सहभागी होता येणार आहे.त्यामुळे शेतकरी सज्ज झाले आहेत. राज्याच्या अनेक भागात पाऊस आला असला तरी तालुक्यात मात्र पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

संपादकीय

# नवे राजकीय पर्व



राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजे एनडीएचे पाचवे सरकार उद्या, रविवारी शपथ घेणार आहे. सन १९९६मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांचे १३ दिवसांचे सरकार आले. नंतर देवेगौडा व गुजराल यांच्या अल्पजीवी सरकारांनंतर मुदतपूर्व निवडणूक झाली; तेव्हा १९९८च्या मे महिन्यात भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली एनडीएची स्थापना झाली. या आघाडीला २६ वर्षे पुरी झाली. वाजपेयींची दोन्ही सरकारे खऱ्या अर्थाने आघाडीची होती आणि २००४मधल्या पराभवातही मित्रपक्षांचा वाटाच निर्णायक ठरला.नरेंद्र मोदी यांची २०१४ आणि २०१९ मधली सरकारे निव्वळ औपचारिकता म्हणून एनडीएची होती. राजीव गांधी यांच्यानंतर (१९८४) एकाच पक्षाचे निखळ बहुमत मिळविणारे पहिले सरकार म्हणून २०१४मध्ये मोदींचा विशेष गौरव होत होता. त्या गौरवाचा शंखनाद २०१९मध्ये वाढला. आज परिस्थिती अटल–युगासारखी झाली आहे. मित्रपक्षांशिवाय सरकार चालू शकणार नाही. पंतप्रधान मोदी हे अत्यंत हुशार आणि लवचिक नेते असल्याने त्यांनी निकाल येताच मेंदूला जणू भाजपऐवजी एनडीए असा शब्द वापरण्याची सूचनाच देऊन टाकली. एनडीएच्या संसदीय नेतेपदी निवड झाल्यानंतर त्यांच्या भाषणातून ते सलग तिसरे एनडीएचेच सरकार चालविणार आहेत; असा भास होत होता. वस्तुस्थिती तशी नाही. मित्रपक्षच नव्हे, तर पक्षातीलही अनेक ज्येष्ठ नेत्यांचाही सन्मान या दशकात राखला गेला नाही. विजय मिळवूनही तडकाफडकी मुख्यमंत्रिपद गेलेले शिवराजसिंह चौहान यांची सध्या छोट्या पडद्यावर वारंवार दिसणारी छबी किंवा नेतेपदाच्या प्रस्तावाला अनुमोदन देणारे नितीन गडकरी, ही बदलत्या काळाची खूण आहे.जुन्या संसद भवनात एनडीएच्या बैठकीत मोदी, नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू यांची बोली आणि देहबोली विलक्षण स्नेहाची होती. हेच चंद्राबाबू, मोदी सत्तेत आल्यावर दीर्घकाळ भाजपपासून दूर होते. नितीश यांचे राजकीय झोके तर विचारायलाच नकोत. पण त्यांची अफाट स्तुतिसुमने सगळ्या सीमा ओलांडणारी होती. त्यांनी मोदींसमोर नमस्कारासाठी वाकणे हे अचंब्यात पाडणारे होते. हे तिघेही नेते एकाच पिढीचे. त्यांचा सुसंवाद हीच सरकारच्या स्थैर्याची हमी असेल. मंत्रिमंडळाची रचना होताना या सुसंवादाची कसोटी लागेल. दीर्घकाळचे मुख्यमंत्रिपद आणि लागोपाठ दोनदा जिंकलेली दिल्ली; यात मोदींना आघाडी सरकार चालवावे लागले नाही. सन २०१४पासून तर त्यांची पक्ष व सरकारवर अक्षरश: पोलादी पकड आहे; ती यावेळचा निकाल येताक्षणी ढिली पडली. हे नवे वास्तव स्वीकारून मोदी यांना पक्ष व सरकारमध्ये मोठे बदल करावे लागतील. अनेक तडजोडी स्वीकाराव्या लागतील. या नव्या राजकीय पर्वात गृहमंत्री अमित शहा यांचे महत्त्व उणावल्यास नवल नाही. पक्षात अनेक सौम्य, संवादी, अनुभवी नेते आहेत. त्यांच्यासाठी किती व कसा अवकाश निर्माण होतो, हे आता कळेल. तो अवकाश पक्ष व सरकार या दोन्हींच्या प्रकृतीला मानवणारा असू शकतो.एनडीएच्या नेतेपदी निवड झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी केलेले भाषण मात्र जुन्याच पठडीतले होते. काँग्रेसची खिल्ली उडवायला ते विसरले नाहीत. 'आपला विजयच झाला आहे...' असे ते सांगत होते. ते तांत्रिकदृष्ट्या योग्य होते. तसेच, इतिहासाशी तुलना करता काँग्रेसची ताकद आजही खूप तोकडी आहे. मात्र, मतदारांनी भाजपला अनेक ठिकाणी जो जबर झटका दिला; त्याची जाणीव मोदींच्या बोलण्यातून यायला हवी होती. 'आमचे काही चुकले–राहिले असेल तर यावेळी आम्ही नक्की सुधारणा करू...' असे या जागी वाजपेयी असते तर नक्कीच म्हणाले असते. पारदर्शी विनम्र भावाने मोदी असे म्हणू शकले नाहीत. सगळ्या पंतप्रधानांच्या विविध भाषणांची प्रचारात साक्ष काढणाऱ्या मोदींनी वाजपेयी यांचीही काही भाषणे अभ्यासायला हरकत नाही. राष्ट्रपतींना सरकार स्थापनेचा दावा सादर केल्यानंतर मोदी यांनी, रविवारी शपथविधी होईल, असे सांगितले. आता भाजपमध्ये सरकार आणि पक्ष यांची फेररचना एकदमच होईल. नड्डा यांचे अध्यक्षपद संपेल. या साऱ्याबाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काय विचार करतो, हेही लवकरच दिसेल. मोदींसोबत कधी ना कधी काम केलेल्या कॅबिनेट व राज्य अशा वीस मंत्र्यांचा पराभव झाला आहे. हा मोठा धक्का आहे. आता मित्रपक्ष मोठी खाती मागतील. 'सबका साथ, सबका विश्वास' ही घोषणा आकर्षक आहे. पण आघाडी सरकार चालविताना अहंकाराला मुरड घालून ती प्रत्यक्षात आणणे, सोपे नसते. विरोधकांचा 'इंडिया' हा समूह किती एकसंध आहे, हेही लवकरच कळेल. नव्या अंकगणितात लोकसभा व राज्यसभेने गांभीर्याने पण सखोल चर्चा करून काम निपटायला हवे. 'मिली–जुली सरकार' या हिंदी शब्दप्रयोगाला 'आघाडी'पेक्षा सखोल लक्ष्यार्थ आहे. तो अर्थ पी. व्ही. नरसिंह राव, अटलबिहारी वाजपेयी, डॉ. मनमोहन सिंग या कर्तबगार पंतप्रधानांनी गेल्या तीन दशकांमध्ये अंगी मुरवून घेतला आणि तसे काम केले. मागची दहा वर्षे विसरून मोदींना हे शिकावे लागेल.

# मातीत मिसळण्याची गोष्ट हळव्या मनाला हृद्य साद

लोकनेता न्युज नेटवर्क

ग्रंथच माणसाला सर्वार्थाने समृद्ध करतात. कोणताही सृजन निर्मिती करतांना आपल्या मनाच्या अनंत कप्प्यातील सर्वांगसुंदर भावभावना आपल्या माधुर्य आणि सुंदरतेच्या अवीट मिश्रणातून शब्दांकित करत असतो. एक पुस्तक हजारो नवनव्या गोष्टींची गुप्तता प्रकट करतांना वाचकाला अंतर्बाह्य हलवून टाकते, खिळवून ठेवते. वाचतांना माणूस हसतो, रडतो आणि सहजतेने मानव्य भावनांचे विरेचन झाल्याने तो सर्वार्थाने सुखावून जातो. यातूनच जीवन जगण्याला नवी दिशा आणि विभिन्न आयाम प्राप्त होतात. एका पुग्रंथातून अनेक प्रेदेश, प्रेवेश आणि प्रेषित मानवी मनाला हळूवार स्पर्शून जातांना लेखक कधी आपला मित्र आणि आपण लेखकाचे जिवलग बनतो हेच कळत नाही! एक एकाचे हृदयी, गोडी साखरेच्या ठायी प्रमाणे लेखक–वाचक–पुस्तक एकरूप होऊन जातात! पुस्तक वाचून झाल्यावर काही काळ तरी हे वेगवेगळे होणे अशक्यच! एवढे लिहिण्याचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवयित्री, अनुवादक आणि सिद्धहस्त लेखिका सुजाता राऊत यांचामातीत मिसळण्याची गोष्टहा ललित लेख संग्रह! काही दिवसांपुर्वीसाहित्याक्षरयाव्हॉट्सप ग्रुपवर या पुस्तकाचे समीक्षण वाचायला मिळाले. समीक्षण मी वाचले नाही, परंतु या पुस्तकाच्या शीर्षकाने मला भुरळ घातली. काही दिवसांनी हे पुस्तक मला उपलब्ध झाले, परंतु अचानक हातावरची कामे वाढली आणि हे पुस्तक बाजूला पडले. त्यांतर तब्बल एक वर्षांनी हे पुस्तक हातात घेतले आणि एका बैठकीत संपवले.



प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो.९१५८०६४०६८

सौ.सोनाली शिंदे यांच्यासृजन संवाद प्रकाशन ठाणेयांनी प्रकाशित केलेले हे पुस्तक बाह्यस्वरूपाने उत्तम आणि हाताळण्यायोग्य झाले असून अश्विनी खटावकर–गीतेश शिंदे यांनी रेखाटलेले मुखपृष्ठ, आतील कृष्णधवल वेली, झाड इत्यादी सर्वकाही सुंदर जुळून आले आहे. त्याचप्रमाणे संपादक, लेखक श्री अरुण शेवते यांनी केलेली संक्षिप्त साक्षेपी पाठराखण पुस्तकाला समृद्ध करते आहे.बाह्यस्वरूपापेक्षाही या पुस्तकाचे अंतरंग वाचकांना खिळवून ठेवणारे आहे हे विशेष! एक काळ होता, लेखक समीक्षकांना घाबरायचे, परंतु आज लेखक स्वतः वाचकांना आव्हान करून माझ्या ग्रंथाचे समीक्षण झाले पाहिजे या मतातून बाहेर येतो तेंव्हाच कळते की; हे नाणे खणखणीत आहे! एकूण २४ प्रकरणात विभागलेले सुजाता राऊत यांचेमातीत मिसळण्याची गोष्टहे पुस्तक वाचकाची पकड ढिली पडू देत नाही. मध्येमध्ये काही वर्णने लांबत गेली आहेत, परंतु सुंदर वनराईने नटलेल्या प्रदेशात प्रवास करतांना मध्ये एखादे ओसाड माळरान येतच असते! सुंदर विचार असणारा माणूसच सुंदर कलाकृती निर्माण करू शकतो. वाहती नदी अनंत उपकार करत आपले कार्य अव्याहतपणे करतांना गावं, शहरं आणि शेतांचे भरण पोषण करून माणसांना जगवते–जागवते. तसे या ललित ग्रंथातील २४ प्रकरणे म्हणजे चोवीस रत्नेच म्हणायला हरकत नाही. लेखिका सुजाता राऊत मोठ्या चोखंदळ रसिक लेखिका आहेत. त्या बहुआयामी वाचक, सृजन असून त्यांच्यातील भावविभोर कवयित्री आपल्याला पुस्तकात जागोजागी भेटत राहते. हे पुस्तक म्हणजे गद्य आणि पद्याचा सुरेल संगम! लेखिका मोठ्या हळव्या मनाच्या कन्या आहेत हे पण पुस्तकात झाकून रहात नाही. लेखिकेचे सूक्ष्म निरीक्षण त्यांच्या विविध शहरांच्या वर्णनावरून लक्षात येते की; त्या उत्तम पर्यटकसुद्धा आहेत. लेखिका चित्रपट प्रेमी आणि समीक्षक, संगीतप्रेमी आहेत. एखादे पुस्तक वाचतांना त्याच्या सोबतीने अनेक पुस्तके भेटत जातात. तशी इथे दोन महत्वपूर्ण पुस्तकं भेटतात ती म्हणजे सॉक्रेटीसचेसूर्य पाहिलेला माणूसआणि नोबेल जर्मन कादंबरीकार हर्मन हेसेचेसिद्धार्थ!'गवाक्षातुनी चंद्र दिसे' या पहिल्याच प्रकरणात लेखिका आपल्या जादुई भाषेने वाचकांना सोबत यायला भाग पडतात. शिवनेरी, बाल शिवबा यांचे आपसूक दर्शन घडवतांना काही खिडक्यांमधून दिसली मोहक दृश्य,





काहीतून दिसली अंतरांगणे, काहीमधून माणसांचे आजवर न दिसलेले चेहरे समोर आले असे वैश्विक सत्य चित्रित होते. खिडकीवरील गोकर्ण वेल, प्रीती दीदी विषयी, खिडकीमध्ये काळोख पसरला. हातातल्या फुलांच्या पाकळ्या गळत चालल्या. एक खिडकी बंद झाली होती हे वाचतांना लेखीकेतील हळवी स्त्री भेटते. लेखिका अप्रतिम कवयित्री आहे याचा दरवळ संपूर्ण पुस्तकभर सुटला असून काव्यगंध वाचकाला सतत मंत्रमुग्ध करत मिरवतो आहे. त्यानंतर आपणपॅरिसचे लूव्र म्युझियम, फ्रेंच विंडो, राजस्थान, जैसलमेरचा हवामहल पाहत पुण्याच्या 'रेड लाईट' एरियातील गडद लिपस्टिक लावलेल्या खिडकीतून हळूच पुढे सरकतो. जॉएसच्या कवितेने शेवट होतांना, आपल्या मनाची खिडकी उघडून स्वतःच्या अंतःकरणात बघता आले पाहिजे. खिडकीतून आत काय घ्यायचे? शांतता, विश्वास, निर्मोह, आनंद! असे वाचले की; पुस्तकातील पुढचे प्रकरण वाचण्याची ओढ कायम राहते. पुढे लेखिका 'कोरड्या नदी पात्रातू'न गावाकडे घेऊन जातांना गावातील पंगत, तिथल्या भाज्यांची चव ओठावर जागवते. गंगाजी का तट' प्रकरण उघडतांना सुप्रसिद्ध ग ायक अनुप जलोटांच्या गायकीची आठवण होत सुप्रसिद्ध हिंदी कवी सत्यार्थच्या ओळीं या प्रकरणाची दिशा निश्चित करतात. गंगा...भारताची हृदय रेखा. गंगा म्हणजे पावित्र्य. गंगा म्हणजे निर्मळता हे वाचतांना वाचे म्हणता गंगा गंगा।सकळ दोष जाती भंगा हा संत नामदेवांचा अभंग खुणावून जातो. गंगेतील दिवे, उगमाकडे जातांना 'मुळाकडे परतणे' वाचतांना आपण लेखिकेसोबत भ्रमंती करत राहतो.या ग्रंथातील सर्वच प्रकरणे वाचकाच्या हृदयाला हळवी साद घालत पुढे सरकतात. पुस्तकं माणसांना कृतीशील बनवतात या न्यायाने प्रस्तुत पुस्तकाने मला 'साहिब, बीबी और गुलाम' (१९६२), 'स्वामी' (१९७७) आणि 'दि विलो ट्री'(२००५) हे तीन चित्रपट पहायला लावले. यातून लेखिका उत्तम चित्रपट समीक्षक आहेत हे ही इथे अधोरेखित झाले आहे. लेखिकासुगरण आहेत की नाही माहिती नाही; परंतु त्या रसज्ञ आहेत हे नक्की! स्वयंपाक घरातील तळणाचा गंध, ज्योतिबाच्या नैवेद्यातील पुरणपोळी, वर तुपाची धार आणि कटाच्या आमटीचा स्वाद, चकल्याचा खमंग वास 'तळण आणि दरवळ' वाचतांना अनेकवेळा आला. 'एक लिंब झेलू बाई'तील भोंडला, 'सुखे सावन बरस गये' मधील नागपंचमी, 'व्यामोह सरतांना'मधील गिरनार पर्वत–दत्तात्रय दर्शन, 'द्वारकाधीश राणा'ची मनमोहक द्वारिका, 'खिचडी'तील बिचारे प्रधान काका, 'फोटो'त कुर्ला स्टेशनवरचा अर्धनग्न शिवाचा मिडियावरील व्हायरल फोटो, 'दस रुपया'तील गरीब छोटू, 'पुन्हा उगवते रान'मधील बहिणीचा मुलगा अक्षयचा अकाली मृत्यू इत्यादी सर्व काही मानवी मनाला सहज साद घालतांना आपले हळवेपण आपसूक जागे होते. याचे महत्वपूर्ण कारण म्हणजे ग्रंथातील भाषा अत्यंत मृदू–मुलायम हृदयस्पर्शी असून बाळाच्या मऊ स्पर्श, निरागस हस्याप्रमाणे मानवी मनावरून अलगद ओसंडत राहते.

मातीत मिसळण्याची गोष्टया ग्रंथाची एकूणच भट्टी उत्तम जमली आहे. यावर काही शब्दात लिहिणे मोठे कठीण आहे. 'मृगजळ दिसे साचपण ऐसे' या शेवटच्या लेखातून लेखिका माणसाचे जगणे आणि संघर्ष अव्याहतपणे सुरु असून कुठेतरी लागेल पाण्याचा झरा आणि एक दिवस आटलेली नदी पुन्हा तुडुंब तृप्त होईल आशेने ग्रंथ थांबतो. मानवी मन–भावनेला साद घालणारा हा ग्रंथ आपणही वाचावा या आव्हानासह सुजाता राऊत यांना पुढील लेखनासाठी शुभेच्छा देतो!

# बुद्धिबळातील चमकता तारा

लोकनेता न्युज नेटवर्क

भारतीय बुद्धिबळ म्हणजे विश्वनाथन आनंद असे समीकरण कित्येक वर्षे होते. मात्र आर. प्रज्ञानंद, डी. गुकेश आणि अर्जुन एरिगेसी यांनी ते बदलले. कँडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा जिंकून जागतिक विजेत्या डिंग लिरेनचा आव्हानवीर झालेला गुकेश आणि अर्जुन एरिगेसी हे यापूर्वीच जागतिक क्रमवारीत अव्वल दहामध्ये होते; आता प्रज्ञानंदने ही कामगिरी केली आहे. प्रज्ञानंदने तीन क्रमांकाने ही प्रगती करताना विश्वनाथन आनंदला मागे टाकले आहे.प्रज्ञानंद आणि त्याची बहीण आर. वैशाली हे कँडिडेट्स स्पर्धेस पात्र ठरलेले पहिले भाऊ–बहीण होते. त्या वेळी या दोघांकडून कँडिडेट्स स्पर्धेत विजेतेपदाची अपेक्षा होती. मात्र, दोघेही त्यात अपयशी ठरले. ऐन वेळी पात्रता मिळवलेला गुकेश या स्पर्धेत खूपच सरस ठरला. त्यामुळे प्रज्ञानंदच्या क्षमतेबाबत शंका घेण्यास सुरुवात झाली होती. मात्र, त्याने जागतिक क्रमवारीत अव्वल असलेला मॅग्नस कार्लसन आणि दुसरा असलेला फॅबिआनो कॅरुआना यांना काही दिवसांच्या अंतराने पराभूत करून आपण उच्च दर्जाचा खेळ करू शकतो, हे दाखवून दिले.वयाच्या दहाव्या वर्षी आंतरराष्ट्रीय मास्टर, अवघे १२ वर्षे



१० महिने वय असताना ग्रँडमास्टर ही कामगिरी करणाऱ्या प्रज्ञानंदची दखल मॅग्नस कार्लसनसारख्या खेळाडूंनीही घेतली. वर्ल्ड कप स्पर्धेत लागोपाठ चमकदार विजय मिळवून त्याने बुद्धिबळाला क्रिकेटच्या तोडीचे स्थान देण्यास माध्यमांना भाग पाडले. प्रज्ञानंद भारतातच नव्हे, तर परदेशातही लोकप्रिय आहे. नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धा संयोजकांनी प्रज्ञानंदचा व्हिडिओ प्रसारीत केला आहे. त्यात १८ वर्षांच्या, कपाळाला कायम शुभ्र टिळा लावणाऱ्या या युवकाची लोकप्रियता दिसते. त्यात चाहते त्याची स्वाक्षरी घेण्यासाठी, त्याच्यासह सेल्फी घेण्यासाठी गर्दी करीत आहेत, असे दिसते. त्याने प्रथमच एकाच स्पर्धेत जगातील सर्वोत्तम दोन खेळाडूंना पराभूत केले आहे. असामान्य, विलक्षण बुद्धिमत्तेचा प्रज्ञानंद ही स्पर्धा गाजवत आहे. संयोजकांचा हा व्हिडीओच प्रज्ञानंदची जगभरात किती नोंद घेतली जात आहे, ते अधोरेखित करते.

# विरोधाचाही 'आगाज'

लोकनेता न्युज नेटवर्क

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तिसऱ्यांदा देशात राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सत्तारूढ होत असतानाच, संख्याबळाची ताकद वाढलेल्या विरोधी पक्षांनीही आक्रमकतेची चुणूक दाखवून दिली आहे. मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्ष आणि त्यामुळे शेअर बाजारात झालेली उलथापालथ यांमागे सूत्रबद्ध हालचाली झाल्याचा आरोप करून राहुल गांधी यांनी थेट पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना जबाबदार धरले आहे. या कथित गैरव्यवहाराची संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशीची मागणी त्यांनी केली आहे.गेल्या शनिवारी मतदानोत्तर चाचण्यांनी, भारतीय जनता पक्ष आणि 'एनडीए'ला चारशेहून अधिक जागा मिळतील, असे अंदाज वर्तविले होते. त्यामुळे सोमवारी शेअर बाजाराने उसळी घेतली. मात्र, मंगळवारी निकालांमध्ये भाजप अडीचशे, तर 'एनडीए' तीनशेपर्यंतच घुटमळल्याचे स्पष्ट झाले, तेव्हा बाजार कोसळला. या काळात गुंतवणूकदारांचे सुमारे तीस लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. याच काळात पंतप्रधान, गृहमंत्री आणि अर्थमंत्र्यांनी तेजी येणार असल्याचा हवाला देत शेअर खरेदीचे आवाहन केले होते, असा घटनाक्रम मांडून राहुल गांधी यांनी या उच्चपदस्थांनी बाजारातील उलाढालीस हातभार लावल्याचा आरोप केला आहे. भाजपकडून हे आरोप फेटाळत गुंतवणूकदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे प्रत्युत्तर देण्यात आले आहे. यापूर्वीही २००४मध्ये सत्ताबदल होताना शेअर बाजार कोसळला होता. मात्र, सत्ताधाऱ्यांवर थेट असे आरोप झाले नव्हते. या विषयातील तांत्रिकता पाहता बाजारात उडालेला गोंधळ, गुंतवणूकदारांचे नुकसान आणि त्यामागे काही गैरप्रकार आहेत का, हे तपासायला हवे. शेअर बाजारात अशा 'लॉबी' कार्यरत असतात. त्यामुळेच या आरोपांची शहानिशा आवश्यक आहे; पण या निमित्ताने संसदेच्या नव्या सभागृहातील चित्र कसे असेल, याची झलक दिसली.पूर्वीप्रमाणे बहुमताच्या जोरावर कामकाज न रेटता सरकारला आक्रमक विरोधकांना तोंड द्यावे लागणार आहे. गेल्या दोन कार्यकाळांप्रमाणे आरोप करणाऱ्या विरोधकांचा पाणउतारा किंवा प्रसंगी घाऊक निलंबन करण्याची कार्यशैली बदलून विरोधकांशी संवादाचे पर्व सुरू करावे लागेल. दुसरीकडे भारतीय शेअर बाजारही भावनांच्या हिंदोळ्यांवर झुलतो, हे पुन्हा स्पष्ट झाले. त्यामुळे थोडे धारिष्ट्य दाखविणारे सट्टेबाज वगळता गुंतवणूक करणाऱ्या सरकारी संस्था आणि सर्वसामान्य गुंतवणूकदारांनीही आपल्या पैशांबाबत अधिक सजगता बाळगायला हवी. त्यासाठी आर्थिक साक्षरता आणि पारदर्शकताही वाढायला हवी.

# कृषी विभागातील रिक्त पदांची भरती करा;जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक पदच रिक्त बोगस बियाणे,खतांचा काळाबाजार रोखणार कसा?-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

सध्या खरीप २०२४ हंगाम सुरू झाला असुन या हंगामात शेतकरी मोठ्या प्रमाणात बियाणे,खते व औषधी खरेदी करतात.मात्र काही कृषी दुकानदारांकडुन खत , बियाणे यांची कृत्रिम टंचाई करून चढ्या भावाने विक्री करत शेतकऱ्यांची आर्थिक लुट सुरू असुन त्यांच्यावर कारवाईची मागणी होत असताना खते, बियाणे,किडनाशके निर्मितीचे आणि विक्रीचे वितरण तसेच कारवाई करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक पदच रिक्त असुन खते बियांण्यांचा काळाबाजार रोखणार कसा?? असा प्रश्न पडला असुन बीड जिल्हा कृषी विभागातील जिल्हा गुण नियंत्रक निरीक्षक पदासह ईतर जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी ,२उप संचालक तसेच ३ उपविभागीय कृषी अधिकारी आणि परळी, अंबेजोगाई येथील तालुका कृषी अधिकारी पदे रिक्त असल्याने शेतकऱ्यांची हेळसांड होत असुन तातडीने रिक्त पदे भरण्यात यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे ,शेख युनुस,सूदाम तांदळे,शेख मुबीन, रामनाथ खोड यांनी बाबासाहेब जेजुरीकर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड, शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत कृषीमंत्री धनंजय मुंडे, सचिव कृषी विभाग, आयुक्त (कृषी), विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजीनगर यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

खते, बियाणे,किडनाशके निर्मितीचे आणि विक्रीचे परवाने (झर्शीींळलळवश,डशशवी,ऋर्शीींळश्रळूशीी ीं-वींलींळेप श्रळलशपलश) वितरण तसेच कारवाई साठी अत्यंत महत्त्वाचे जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक पद रिक्त आहे.उत्पादने कंपनी आणि कायदेशीर मानकांशी जुळतात याची खात्री करण्यापूर्वी, दरम्यान आणि नंतर उत्पादनांची तपासणी करण्याची जबाबदारी गुणवत्ता नियंत्रकाची आहे.

सध्या खरीप २०२४ हंगाम सुरू झालेला आहे.या हंगामात शेतकरी मोठ्या प्रमाणात बियाणे,खते व नंतर औषधे खरेदी करतात.त्यांना उत्तम दर्जाचे खते, बियाणे व औषधे मुबलक आणि योग्य किंमतीत उपलब्ध व्हावे तसेच बियाणे,खतांचा तुटवडा भासू नये, विशेषतः निविष्ठा उद्योगांना परवाना देणे,परवाने रद्द करणे,धाडी टाकणे, कारवाई करणे किंवा केलेली कारवाई मागे घेणे यात मुख्य गुणवत्ता नियंत्रण आधिका-याचा प्रमुख सहभाग असतो.पोलिस खात्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या निरीक्षक पदाला असलेले महत्त्व गुणवत्ता नियंत्रण अधिकारी पदाला आहे.या उद्देशाने राज्यात गुणवत्ता नियंत्रण विभाग कार्यरत आहे.मात्र बीड कृषी विभागातील खते, बियाणे,किडनाशके निर्मितीचे आणि विक्रीचे परवाने




वितरण तसेच कारवाई करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे मुख्य गुणवत्ता नियंत्रण आधिकारीपद (र्जीरश्रळीूं उेप-ीींश्र -वाळपळींीीरीीं) पद रिक्त असुन तातडीने भरण्यात यावे.कृषी विभाग जिल्हा परीषदेचा महत्वाचा विभाग असुन कृषी विभाग अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतात.शेतक-यांच्या सर्वांगीण विकासासाठी फळबाग लागवड, यांत्रिकीकरण, ठिंबक सिंचन,स्प्रिंकलर, मोफत बियाणे वाटप,माती परीक्षण आदि वैयक्तिक लाभाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्याचे काम कृषी विभागामार्फत करण्यात येते.शेतीविषयक वस्तुंची उदा.खते,बी -बियाणे, औजारे इत्यादींचा पुरवठा करणाऱ्या कृषीसेवा केंद्राला परवाना देण्याचे कार्य या विभागामार्फत करण्यात येते. मात्र जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी पद रिक्त असुन तातडीने भरण्यात यावे.महाराष्ट्र राज्य कृषीमंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजयजी मुंडे यांच्या परळी मतदार संघातील तसेच अंबेजोगाई या दोन्ही ठिकाणी तालुका कृषी अधिकारी पदे रिक्त आहेत.शेतक-यांना विविध योजनांची माहिती देणे त्याचबरोबर शेतकऱ्यांमध्ये कृषी विस्तार किंवा कृषी संसाधने बाबत शेतकऱ्यांना योग्य माहिती पुरवणे तसेच शेतकऱ्यांसाठी विविध प्रशिक्षणाचे आयोजन करणे त्याच बरोबर शेतकऱ्यांचे विविध ठिकाणी मेळावे आयोजित करणे तालुका कृषी अधिकाऱ्यांचे काम असुन अत्यंत महत्त्वाचे म्हणजे अतिवृष्टी किंवा कोरडा दुष्काळ दरम्यान पंचनामे तयार करण्याचे काम महसूल विभागातील तलाठी आणि कृषी विभागातील कृषी सहायक करत असुन याची जबाबदारी तालुका कृषी अधिकाऱ्याची असते.मात्र परळी आणि अंबेजोगाई येथील तालुका कृषी अधिकारी पदे रिक्त असुन तातडीने भरण्यात यावीत.बीड जिल्ह्यातील कृषी विभागातील एकुण ४४ टक्के रिक्त पदे असल्याने मनुष्यबळ अभावी कृषी विभागातील कामे खोळंबली असुन त्यामुळे शेतकऱ्यांची हेळसांड होत असुन तातडीने रिक्त पदे भरण्यात यावीत यासाठी १५ आगस्ट २०२३ रोजी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येऊन कृषीमंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांना प्रत्यक्ष निवेदन देण्यात आले होते.मात्र अद्याप रिक्त पदांची भरती करण्यात आलेली नाही.कृषीमंत्र्यांच्या जिल्ह्यातच कृषी विभागातील रिक्त पदे भरण्यास होत असलेला विलंब समाधानकारक नाही.कृषी उपसंचालक , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड १ पद, उपविभागीय कृषी अधिकारी बीड , माजलगाव, अंबेजोगाई येथील प्रत्येकी १ पद आणि कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद बीड व प्रकल्प उप संचालक आत्मा कार्यालय बीड अशी एकूण ६ मंजुर पदापैकी ६ पदे रिक्त आहेत.

# बीड जि.प.समाज कल्याण अधिकारी आर.एम. शिंदे यास बायकोने झोडपले

## चक्क मुलांने व बायकोने चोपदेत एस.पी.ऑफिसमध्ये आणले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

गेल्या दोन वर्षापासून चाललेला गोंधळ अखेर चव्हाट्यावर आला बीडच्या जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकाऱ्याला चक्क पहिल्या बायकोने व मुलाने भर चौकात केली मारहाण सोबतीतच पोलिसा समोर हाजर केला.




गेल्या अनेक वर्षापासून पहिला बायकोला सोडून बीड जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी आर.एम.शिंदे हा प्रेम संबंधात ठेवलेल्या एका अन्य स्त्रीसोबत राहू लागला आणि तीच्या साठी सर्वस्व होऊन बसला मात्र पहिली बायको आणि मुलं हे वाऱ्यावर सोडले पहिल्या बायकोचे आणि मुलांचे खाण्याचेही वांदे करून टाकले मात्र या मुलांना याच्या रंगेलपणा मुळे शिक्षणा पासूनही वंचित राहावं लागलं मात्र या सगळ्या गोष्टीला पाहून पहिली पत्नी रणरागिणी होऊन चक्क पतीला अनेक वेळेस विणवल्यानंतर ही तो ऐकत नसल्याने त्याला चक्क राजीव गांधी चौकातून त्याला चोप देत एस.पी.कार्यालय व त्यानंतर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आणले आहे. बातमी करे पर्यंत गुन्हा नोंदणी प्रक्रिया शिवाजीनगर पोलीस ठाण्यात सुरू आहे. घडलेल्या प्रकरणाचा तपास पोलीस करत आहेत.

# वीज पडून दोन बैलांचा जागीच मृत्यू सेनगाव तालुक्यातील भंडारी येथील घटना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील भंडारी येथे दिनांक १० जून रोजी चार वाजण्याच्या सुमारास अचानक वादळी वाऱ्यासह विजेच्या करकडामध्ये दोन बैलांचा जागीच मृत्यू झाला असून चांदखॉ जिलालीखॉ पठाण यांनी आपल्या शेतामध्ये बैल जोडी बांधली असता अचानक वादळी वाऱ्यासह पाऊस आणि विजाच्या करकटामध्ये दोन बैलाचा मृत्यू झाला असून घटनास्थळी पंचनामा (एस,के घुगे) यांनी पंचनामा केला एक लाखाहून अधिक किमतीचे बैल असल्याने परिसरामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे, शासनाने मदत द्यावी अशी विनंती शेतकऱ्यांनी केली आहे.




# बीडचा विजयोत्सव करताना ज्योतीताई मेटेंचा त्याग विसरता येणार नाही-ज्ञानेश्वर चौधरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

लोकसभा निवडणुकीत विजयोत्सव साजरा करताना बीड जिल्ह्याच्या राजकारणात समाजाप्रती त्याग अन् समर्पणासाठी ज्या माऊलीचे नाव घेतले जाते त्या म्हणजे लोकनेते स्व.विनायक मेटे साहेब यांच्या सुविद्य पत्नी डॉ. ज्योतिताई विनायक मेटे... या विजयोत्सव साजरा करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा असल्याचे प्रतिपादन शिवसंग्रामचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले आहे. सुपर क्लासवन असलेल्या उच्चपदस्थ नोकरीतुन स्वेच्छा निवृत्ती घेतल्यानंतर बहूजन नायक लोकनेते स्व.विनायक मेटे साहेबांचे स्वप्न साकार करण्यासाठी व त्यांनी जतन केलेला वसा आणि वारसा, समाजाप्रती तळमळ तसेच समाजहितासाठी अत्यंत कमी काळात इच्छा,जिद्द, कष्ट, संयम आणि समर्पण असा बहुअय्यामी वृत्तीच्या बळावर डॉ. ज्योतिताई विनायक मेटे यांनी राजकारणात व समाजकारणात आपला वेगळा ठसा उमटविला. सत्ता असो की नसो, जनतेशी, समाजाशी, मातीशी असलेली बांधिलकी ते अतिशय चोखपणे जपत असून,



नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत समाजहितासाठी बीडमधून एकच मराठा उमेदवार असावा अशी समाजाची भावना होती. समाजभावनेचा आणि लोकआग्रहाचा आदर करून ज्योतीताईंनी निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे मतांचे विभाजन टळले आणि हा सोनेरी दिवस पहाण्याचा सुवर्णयोग जिल्हा वासीयांच्या नशिबी आला. म्हणून तर या माऊलीच्या मनाचा मोठेपणा आणि त्याग नजरे आड करता येणार नाही डॉ.ज्योतीताईंनी मनाचा मोठेपणा दाखवला आणि विजयोत्सव साजरा करण्याचा मान जिल्हावासीयांना मिळाला, लोकनेते स्व.विनायक मेटे साहेबांच्या अकाली जाण्याने पर्वताएवढे दुःख, संघर्ष पाठीशी असताना आणि ताईंनी लोकसभा लढावी यासाठी अनेकांनी देव पाण्यात ठेवलेले असताना केवळ आणि केवळ सामाजिक भावनेचा व समाजहिताचा आदर करून ताईंनी माघार घेतली, माघार घेताना मनातल्या वेदना आणि डोळ्यातल्या ओलसर पापण्यांचे बीड जिल्हा साक्षीदार आहे. बीडचा विजयोत्सव साजरा करताना या माऊलीने समाजिक अस्मितेसाठी केलेला त्याग नजरेआड होता कामा नये, हा त्याग अनमोल आहे, म्हणून खऱ्या अर्थाने या माऊलीच्या त्यागाची सव्याज परतफेड करण्याची जबाबदारी आता समाजाची आहे. स्व.मेटे साहेबांचं स्वप्न आज पुर्ण झालं शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना बहूजन समाजाने परिवर्तनाचा वारसा जपत खासदार केले आहे असे ज्ञानेश्वर चौधरी यांनी सांगितले.

# अल्तमश शेखचे नीट परीक्षेत सुयश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

शहागड येथील प्रसिद्ध सोहेल हॉस्पिटलचे संचालक डॉ.चांद शेख यांचे कनिष्ठ चिरंजीव तथा गेवराई येथील प्रसिद्ध गेवराई हॉस्पिटलचे संचालक डॉ.सोहेल शेख यांचे कनिष्ठ बंधू अल्तमश शेख याने चालू वर्षी (सन २०२४ मध्ये) झालेल्या वैद्यकीय प्रवेश पूर्व छएएढ परीक्षेत ७२० पैकी ६१६ गुण प्राप्त करून यश मिळवल्याबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. अल्तमश शेख यांचे प्राथमिक शिक्षण वाळकेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत, माध्यमिक शिक्षण शहागडच्या जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत झाले असून उच्च माध्यमिक शिक्षण जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रामपुरी तालुका गेवराई येथे झाले आहे. त्यानंतर



त्यांनी लातूर येथील शाहू कॉलेजमध्ये पुढील शिक्षण घेतले. या यशाबद्दल लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष तथा शासकीय कंत्राटदार अय्युब खान पठाण यांनी अल्तमश शेख यांचे अभिनंदन केले आहे.

# उदगीर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण

## पदाधिका-यांच्या उपस्थितीत पक्षाच्या ध्वजाचे ध्वजरोहण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

. उदगीर-समता,बंधुता, एकता व अखंडता यासाठी लढणारा पुरोगामी विचारांचा कृतीशील पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची देशभरात ओळख आहे आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा रौप्य महोत्सवी वर्ष असुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त निमित्त राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजयजी बनसोडे यांच्या मार्गदर्शना नुसार प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत ना.संजय बनसोडे यांच्या संपर्क कार्यालयासमोर पक्षाच्या पदाधिका-यांनी ध्वजारोहण केले.

यावेळी प्रदेश सरचिटणीस समीर शेख, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले पाटील विधानसभा अध्यक्ष प्रवीण भोळे, तालुका कार्याध्यक्ष वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, शहर कार्याध्यक्ष



शशिकांत बनसोडे, शाम डावळे, नवनाथ गायकवाड,अँड.दिपाली औटे, अनिल मुदाळे, नजीर हाश्मी, फैजुखाँ पठाण, फय्याज शेख,बाळासाहेब मरलापल्ले, प्रभाकर पाटील, उदय मुंडकर, सुनिल केंद्रे, इब्राहिम देवर्जनकर, समद शेख, हुसनाबानो शेख, राजकुमार बिरादार, मदन पाटील, अरविंद गिलचे, राजकुमार गंडारे, सतिश कांबळे, राहुल सोनवणे, संघशक्ती बलांडे, इब्राहिम पटेल, रोहिदास कुंडगीर, मदन पाटील, मुकेश भालेराव, महेश बिरादार, सिध्दार्थ सुर्यवंशी, अझहर मोमीन, युवराज कांडगीरे, दिनकर बिरादार, रऊफ थोडगे, फेरोज पठाण, अबरार पठाण, अक्रम जहागीरदार, खाजा पटेल, अखिल मोमीन, सय्यद शेरू, सुग्रीव सुर्यवंशी,आदी उपस्थित होते.

# मनोज घनवट याचा वाढदिवस विविध उपक्रमांने साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

पिंपरी राजा सर्कल मधील युवा उद्योजक व खासदार संदिपान भुमरे साहेब यांचे कट्टर समर्थक असलेले व स्वामी ब्रह्मानंद महाराज क्रीडा प्रबोधनीचे सचिव तथा विविध कार्यकारी सोसायटी सदस्य मनोज घनवट याचा वाढदिवस स्वामी ब्रह्मानंद महाराज क्रीडा प्रबोधनी या संस्थेच्या माध्यमातून लोकांच्या सामाजिक गरजा पुर्ण करत विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला जिल्हात संपर्काचे जाळे निर्माण केलेल्ये युवा सेना तालुका उपाध्यक्ष मनोज घनवट यांच्या वाढदिवसानिमित्त एक व्यक्ती एक झाड भेट तसेच ग्रामिण रूग्नालय येथे रूग्नांना फळ वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला.यावेळी मनोज घनवट यांच्यावर विविध माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव झाला. नाविन्यपूर्णाने उपक्रमांने सामाजिक उपक्रमांत परीसरातील




नागरिकाने सहभाग नोंदवला.यावेळी मित्र परिवाराच्या उपस्थित सर्वांना एक व्यक्ती एक झाड भेट देण्यात आले.तसेच ग्रामिण रूग्नालय येथे रूग्नांना फळ वाटप करण्यात आले.विविध सामाजिक उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी स्वामी ब्रह्मानंद महाराज क्रीडा प्रबोधनीचे अध्यक्ष संदीप शिंदे, अजय वाघमारे, असेफ पटेल ,रवींद्र जाधव, यांच्या सर्व सभासद उपस्थित होते.

# लोणार शहरात वाढले अवैध व्यवसाय,अवैध धंद्यामुळे अनेकांचे कुटुंब होत आहे उध्वस्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

जग प्रसिद्ध लोणार सरोवर सरोवर हे जगातील प्रसिद्ध सरोवर असून येथे रोज हजारो पर्यटक येतात शहरात रहदारीच्या ठिकाणी अवैध ऑनलाईन चक्रि चे आठ ते दहा दुकान असुन काहि दुकान तर शाळेच्या हाकेच्या अंतरावर असुन तरूण तसेच शेतकरी मजूर व्यसनाधीन होत आहे शाळेतील विद्यार्थी तरूण व्यसनाधीन होत चालले आहे.तसेच अवैध चक्रि,वरली मटका अवैध देशी विदेशी दारू विक्री व वाहतूक अवैध ,अवैध गुटखा ,तसेच अवैध सावकारी, असे अनेक अवैध व्यवसाय सुरू आहे.मात्र संबंधित पोलिस प्रक्षासणाला का दिसत नाही? अनेकांनी निवेदनाचा मार्ग अवलंबला मात्र चार दोन दिवस अवैध धंदे बंद केले जातात नंतर जैसे थे अशी परिस्थिती आहे. हे कुण्या राजकीय नेत्यांना दिसत नाही का? फक्त पत्रकार कारांना दिसते.पत्रकारांनी बातमी लावली कि त्यांना अवैध धंदे वाल्याकडुन धमक्या दिल्या जातात त्यांना कोण पाठिशी घालते व सहकार्य करते कोणी समोर येवून अवैध धंदे बंद करण्यासाठी येत नाही यामागे कारण काय आहे.शहरातील दबंग ठाणेदार साहेबांना दिसत नाही का? असा प्रश्न सामान्य माणसाला पडला आहे. यामागे काही आर्थिक देवाणघेवाण होत आहे.हे मात्र खरे हे अवैध धंदे बंद का होत नाही का या मागे काही वेगळे कारण आहे असो माननीय पोलिस अधीक्षक साहेब आपण तरी याकडे लक्ष द्यावे व शहरातील अवैध धंदे बंद करून सर्व सामान्य माणसाला न्याय मिळवून द्यावा अशी अपेक्षा आहे. तरूण व्यसनाधीन



होउन गुन्हेगारी कडे वळत असून यामुळे दारू पिऊन कौटुंबिक कलह निर्माण होत असून जुगारात पैसे घालून शेतकरी मजूर कष्टकरी घरी काही न नेत आपल्या मजूरीचे पैसे हे अवैध ऑनलाईन चक्रि मध्ये घालून दारू पिऊ कुटुंबात कलह निर्माण करतात.तसेच शहरात अवैध सावकारी शहरात वाढली आहे अव्वाच्या सव्वा भावाने पैसे दिले जातात व दमदाटी करून वसुली केली जाते कोणी घरातील माता भगिनी चे दागीणे गहाण ठेवून या ऑनलाईन चक्रि मध्ये घालत आहेत . तसेच शहरांत अवैध सावकारांचे प्रमाण वाढले आहे या अवैध सावकारी विरोधात कारवाई का केली जात नाही.यामुळे दारू पिण्याचे प्रमाण वाढले असो याचे कोणालाही काही घेणे देणे नसुन जो तो गबर होत आहे संबंधित पोलिस प्रक्षासणाला काही दिसतं नाही डोळ्यांवर पट्टी बांधून घेतलीं आहे.हे अवैध धंदे बंद होतील का नाहि पोलिस अधीक्षक साहेब आपणच याकडे लक्ष द्यावे अशी जनतेची अपेक्षा आहे. हे सगळं अवैध धंद्यामुळे होत आहे या अवैध धंदे मुळे अनेकांचे संसार उद्धवस्त होत आहे.अशी चर्चा सर्व सामान्य करीत आहे हे मात्र खरे. कोणी राजकीय नेत्यांनी तरी पुढाकार घेऊन अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी प्रयत्न करावे अशी जनसामान्यांची मागणी आहे.

# सन २०२१ ते २०२५ मधील दिव्यांग बांधवांचा राखीव निधी वाटप करण्यात यावा

## गटविकास अधिकारी यांना निवेदन देऊन केली मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

सन २०२१ ते २०२५ मधील दिव्यांग यांचा राखीव ५% निधी वाटप करण्यात यावा या साठी गटविकास अधिकारी यांना निवेदन देऊन मागणी केली आहे यावेळी गटविकास अधिकारी आष्टी यांना निवेदन देताना काकडे संतोष ( दिव्यांग ), आण्णासाहेब चौधरी ( सामाजिक कार्यकर्ते) , अशोक पोकळे ( युवा नेते), औदुंबर खिलारे (सामाजिक कार्यकर्ते) उपस्थित होते

या निवेदनात म्हटले आहे की शासना कडून



दिव्यांग यांना येणारा निधी सन, २०२१ ते २०२५ वाटप करण्यात आलेला नाही. त्यामुळे आष्टी तालुक्यातील सर्व दिव्यांग उपोषण करण्याच्या मनस्थिती मध्ये आहेत उपोषणाला बसणे टाळाण्यासाठी सदर निधी दि.,२२/६/२०२४ पर्यंत वाटप करण्यात यावा असे गटविकास अधिकारी आष्टी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे

# परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्लीतील नागरी सुविधा सोडवण्यात याव्यात-बालासाहेब जगतकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील नागरी सुविधा सोडवण्यात याव्यात असे लेखी निवेदन वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्ध प्रमुख बाळासाहेब जगतकर यांनी परळी नगरपालिकेस दिले असल्याची माहिती ही प्रसिद्धी पत्रकार द्वारे दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की गेल्या दोन महिन्यापासून परळी नगरपालिकेने पाईपलाईन केली असून त्यामुळे जगतकर गल्ली येथे मोठा खड्डा झाला असून येथे लहान मुलांना व महिलांना जाण्याने कठीण झाले असून यामुळे लहान मुले व महिला या खड्ड्यामध्ये पडत आहेत तसेच गेल्या अनेक



दिवसापासून नवीन वस्ती झालेली शंकर साळवे ते सखाराम जगतकर कुमार जगतकर यांच्या घरापर्यंत नवीन पाईपलाईन टाकून पाण्याची व्यवस्था करण्यात यावी व याच लाईन वर एक वाल टाकून प्रबुद्ध नगर व नवीन वसाहतीस पाण्याची व्यवस्था करण्यात यावी तसेच भीम नगर येथील स्मशानभूमी त अर्धवट राहिलेले लाईटीचे काम पूर्ण करण्यात यावी या व इतर मागण्याची लेखी निवेदन परळी नगरपरिषद यांना दिले असून ते लवकरात लवकर करण्यात यावेत अन्यथा परळी नगरपालिकेवर वंचित बहुजन आघाडी च्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याचेही लेखी निवेदनात म्हटले असल्याची माहिती ही वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बाळासाहेब जगतकर यांनी दिली आहे

# तुळजापूर तालुक्यातील येवती येथे, देशात महायुतीचे सरकार आल्याने महायुती तर्फे जल्लोष साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**तुळजापूर । प्रतिनिधी**

.देशामध्ये महायुतीचे सरकार आल्याने येवती तालुका तुळजापूर जिल्हा धाराशिव येथे महायुती तर्फे जल्लोष साजरा करण्यात आला,यावेळी उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अजित दादा गटाचे युवक तालुका कार्याध्यक्ष. श्री .समाधान सरकार तानाजी ढोले,येवती ग्रामपंचायत माजी सदस्य मेजर सुरेश आण्णा गवळी, श्री श्रीकांत तांबे, श्री सचिन गायकवाड, प्रशांत गवळी,अण्णा शिंदे, जावेद शेख ,अमर तांबे भोपाल गायकवाड,नितीन गायकवाड महेश गवळी, नाना पाटील,सौदागर येडगे, किरण गायकवाड,आदित्य सुतार, विकास गवळी, ईश्वर शिंदे अतुल गायकवाड, किरण शिंदे,सुशांत तांबे,किशोर गायकवाड ,अजय शिंदे, व सर्व महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच येवती ग्रामस्थ यांच्यावतीने जल्लोष करण्यात आला.

## समाधान हॉटेल चे मालक आदित्य कांबळे यांची

# द ग्रामीण युवा पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्कारासाठी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी द युवा ग्रामीण पत्रकार संघातर्फे विवीध क्षेत्रांतील मान्यवरांना उत्कृष्ट कामगिरी बद्दल पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. प्रथम कार्याचा अहवाल मागुन त्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड केली जाते. संघटनेतर्फे पुरस्कार सन्मान सोहळयात मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात येते.

त्यात सामाजिक,क्रिडा,वैद्यकीय, सांस्कृतीक, राजकीय, औद्योगिक इत्यादी क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना या संघटने मार्फत पुरस्कार दिले जातात.यावर्षीच्या उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्कारांसाठी एका होतकरू व जिद्दी उद्योजकाची हॉटेल समाधान चे मालक आदित्य कांबळे यांची निवड झाल्याने गावात एक आदर्श घालून दिला आहे व सर्वच स्तरातून त्याचे कौतुक केले जातं आहे.वाघोली तील रहिवाशी असलेल्या आदित्य कांबळे यांची उत्कृष्ट उद्योजक पुरस्कारासाठी निवड झाली ती त्यांच्या अपार कष्टातून व त्यांनी टिकवुन ठेवलेली पदार्थांची गुणवत्ता.वाघोलीगावातील खवय्यांची खरी झुंबड उडते ती समाधान पोहे खाल्ल्याशिवाय त्यांचं ही समाधान होत नाही. खरीखुरी पोह्यांची चव मिळते ती समाधान हॉटेल मध्येच अन् ग्राहक समाधानी होऊन जातो.समाधान हॉटेल चे मालक आदित्य कांबळे लोकनेता शी



बोलताना सांगतात की समाधान हॉटेल या व्यवसायाची सुरुवात खूप कष्टातून व मेहनतीतून झाली. प्रथम समाधान पोहे या ब्रँड ची निर्मिती केली. मी सुरुवातीला छोटीशी कढई, छोटासा टेबल इत्यादी छोट्याशा भांडवलापासुन चार पाच ग्राहकांपासुन हा व्यवसाय सुरू केला.आज समाधान पोहे पावशेर पोह्यापासुन सुरू झालेला व्यवसाय वाघोली तील खवय्यांसाठी एक पर्वणीच ठरला आहे. समाधान पोह्यांचा व्यवसाय हजारो, लाखो ग्राहकांच्या पसंतीस उतरला आहे. चव आणि गुणवत्ता हिच आमची खरी ओळख असल्यामुळे ग्राहक समाधानी होतात. तसेच पोह्यापासून सुरू झालेला व्यवसाय आज शाबुदाना खिचडी, शिरा, उपमा, मिसळ आणि वडापाव इथपर्यंत पोचला असुन व्यवसायाला चालना मिळाली आहे.कित्तेक नवंउद्योजकांना प्रेरणा मिळाली आहे.तसेच हॉटेल समाधान समुहातर्फे गोर गरीब व गरजूव्यक्तींना, अनाथांना मदतीचा हात देऊन सामाजिक बांधिलकी जपली आहे. नवं उद्योकांसाठी एक आदर्श निर्माण केला आहे.या सर्व गोष्टींची दखल घेऊन द ग्रामीण युवा पत्रकार संघ महाराष्ट्र आयोजित २०२४ चा उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्कार आदित्य कांबळे यांना जाहीर झाला आहे. येणाऱ्या काही दिवसातच सन्मान सोहळा संपन्न होणार आहे त्यात त्यांना गौरविण्यात येणार आहे.

# पंकजाताई मुंडे यांच्या वर आक्षेपार्ह पोष्ट करणाऱ्यावर कारवाई करण्यासाठी तहसीलदार व पोलीसांना निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर पराभूत झालेल्या लोकनेत्या मा.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या विरोधात अत्यंत चुकीच्या पद्धतीने समाज माध्यमावर बदनामीकारक शब्दांच्या रूपातून गरळ ओकणाऱ्या समाजकंटकावर कठोरात कठोर कारवाई करून तातडीने बंदोबस्त करावा या साठी सोमवार दिनांक-१०/०६/२०२४ रोजी पाटोदा तहसीलदार निलावाड व सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार पोलीस ठाणे पाटोदा यांना निवेदन देऊन कार्यकर्त्यांनी जोरदार मागणी केली आहे. लोकनेते पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचे स्थान बीड जिल्ह्याच्या आणि महाराष्ट्रात हिंदुस्थानच्या दृष्टीने अत्यंत मौल्यवान आहे लोकनेते माजी केंद्रीय मंत्री आणि बीड जिल्ह्याचा बुलंद आवाज हिंदुस्तानचे जेष्ठ नेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या त्या कन्या आहेत. अल्पशा मताने पराभूत झाल्यानंतरही बीड आणि महाराष्ट्रासाठी त्यांचे योगदान सत्तेच्या माध्यमातून कायमस्वरूपी असेल अशा या अत्यंत लोकप्रिय आणि विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण नेते असलेल्या पंकजाताई मुंडे यांच्या वर अत्यंत घाणेरड्या पद्धतीने समाज माध्यमावर चुकीच्या पद्धतीने व्यक्त होणाऱ्या नीच वृत्तीच्या समाजकंटकावर पोलीस विभागाच्या आणि प्रशासनाच्या वतीने कठोरात कठोर कारवाई करून त्यांचा बंदोबस्त करावा आणि सामाजिक समता आणि बंधुत्वाचे नाते अबाधित राहिल याची काळजी घ्यावी अशी मागणी निवेदनात विविध जाती धर्म पंथांच्या कार्यकर्ते आणि मुंडे प्रेमी यांनी केली आहे. हे निवेदन देताना विविध जाती पंथ आणि समाजाचे तरुण युवा कार्यकर्ते जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाटोदा येथे देशाच्या नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या विरोधात सोशल मिडियामध्ये गरळ ओकुन बदनामी करणे तसेच



घाणेरडे शब्द पोस्ट करणे याचा निषेध म्हणून दिनांक-१० जून २०२४ सोमवार रोजी तहसीलदार पाटोदा व पोलीस स्टेशन पाटोदा यांना पंकजाताई मुंडे यांच्या वर प्रेम करणाऱ्या सर्व जाती-धर्माच्या वतीने निवेदन देण्यात आले. या प्रसंगी महेंद्र तात्या गर्जे, आप्पासाहेब राख, मधुकर तात्या गर्जे, जि.प.चे माजी अध्यक्ष तथा नगरसेवक सय्यद आब्दुल्ला अबू शेठ, पाटोदा नगर पंचायतचे नगराध्यक्ष राजूभैय्या जाधव, सोमीनाथ कोल्हे, देविदास शेंडगे, रिपाई.तालुकाध्यक्ष नरेंद्र जावळे, सभापती किशोर अडागळे, पांडुरंग नागरगोजे, अनुरथ सानप, सरपंच संजय सानप, संतोष राख, हनुमंत शेलार, डॉ.हरिदास शेलार, गणेश मुंडे, भैया भागवत खाडे, सरपंच किशोर नागरगोजे, सचिन गाडेकर, प्रवीण नागरगोजे, माजी सभापती पिनू जायभाय, प्रकाश सोनसळे, सुरेश वनवे, बन्सी खाडे, संपत केकान, कृष्णा पोले, सरपंच बाळासाहेब घुले, तात्यासाहेब लाड, हुसेन मकरानी, विनोद बांगर, रामदास गिते, आशिष नाईकनवरे, प्रकाश डोरले, महादेव खाडे, प्रकाश तांदळे, आसाराम सानप, भागवत गर्जे, गणेश सानप, अशोक सानप, संजय सानप, संदीप घुले, नितीन सानप, अशोक सानप, अजय सानप, अंगद सांगळे, संदिपान सानप, बाबू सानप, बंडू सानप, बाबुराव सानप, विकास सानप, बाळू पाटील,बाळासाहेब सानप, रोहिदास सानप, सुरेश राख, रावसाहेब बांगर, ऋषिकेश सानप तसेच अनेक गावातील अनेक तरुण मुंडे प्रेमी या वेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904